# परिक्रमा



### ६६ वा कान्स चित्रोत्सवात स्पीलबर्ग ज्युरी अध्यक्ष

अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक स्टीव्हन स्पीलबर्ग येत्या मे महिन्यात भरणाऱ्या ६६व्या कान्स महोत्सवात ज्युरी अध्यक्ष म्हणून काम पहाणार आहेत. स्पीलबर्गच्या ‘शुगर लॅण्ड एक्सप्रेस’ चित्रपटाला उत्कृष्ट पटकथेचा पुरस्कार १९७४ साली कान्समधे मिळाला होता. शिंडलर्स लिस्ट (१९९३) व सेव्हींग प्रायव्हेट रियान (१९९८) या दोन चित्रपटांना ऑस्कर पारितोषिक मिळालेली आहेत. कान्स चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष गिल्स जेकब म्हणाले स्पीलबर्गचे ‘शुगर लॅण्ड एक्सप्रेस’ कलर पर्पल इ. चित्रपट महोत्सवात येत राहिले. पण १९८२ साली ‘इ.टी.’ चित्रपटाचा प्रथम खेळ कान्समधे झाला. तेव्हापासून स्पीलबर्गचे कान्सशी घट्टनाते तयार झाले. दरवर्षी आम्ही त्याला ज्युरी अध्यक्ष म्हणून नियंत्रण देतो. पण तो कायम शुटींग मधे व्यस्त असायचा. यावर्षी तो योग जुळून आला आहे. २०१३चा कान्स महोत्सव १५ ते २६ मे या सप्ताहात संपन्न होत असून भारतीय सिनेमाची १०० वर्षे महोत्सव विशेष रूपाने साजरी करण्यात येणार आहेत.

### ‘सलाम बॉम्बे’चे पुर्नप्रकाशन

मीरा नायर दिग्दर्शित ‘सलाम बॉम्बे’ २५ वर्षांपूर्वी प्रकाशीत झाला. नाना पाटेकर, अनिता कँवर, चित्रपटाप्रमाणेच लोकप्रिय झाले. ‘पीव्हीआर रेअर’या सीरीज खाली ‘सलाम बॉम्बे’ची नवी डिजिटल आवृत्ती काढण्यांत आली आहे. डिजिटल ‘सलाम बॉम्बे’ २२ मार्चला मुंबई, पुणे, कलकत्ता, चेन्नई, अहमदाबाद, बंगलोर, गुरगांव येथील पीव्हीआर थिएटरमधे प्रकाशीत होणार आहे.

## यवतमाळ फिल्म सोसायटीचे उद्घाटन



**ॲड. जीवन पाटील (अध्यक्ष), मान्यवर अतिथी अरुण जोग (यवतमाळ जिल्हा पत्रकार संघटना, अध्यक्ष), संजय माटे (सदस्य) अशोक फाळके (सचिव), अरुण सांगळे (कोषाध्यक्ष), ॲड. मंगेश हातगांवकर (उपाध्यक्ष)**

# ऑस्कर विजेत्या 'ओर्गो'चे वास्तव

– अपर्णा पाटील

**या वर्षीच्या ऑस्कर पुरस्कारांत तेहरान (इराण) मध्ये घडलेल्या थरारनाट्य चित्तारणाऱ्या 'ओर्गो' या चित्रपटाला श्रेष्ठ चित्रपटाचे ऑस्कर मिळाले. स्पीलबर्गचा 'लिंकन' 'झिरो डार्क थर्टी' इ. अमेरिकन चित्रपट स्पर्धेत होते.पण बाजी मारली बेन ॲपलेक दिग्दर्शित आर्गो ने ! चित्रपटाचे आर्गो हे नांव कल्पित चित्रपटासाठी घेण्यात आले होते.**

**अमेरिकेच्या** फर्स्ट लेडी मिशेल ओबामा यांनी, यंदाच्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या नावाची घोषणा केली. त्या सिनेमाचं नाव आहे आर्गो. ऑस्कर पुरस्काराचं महत्त्व आणि त्यासाठी निवड झालेले सिनेमे हे नेहमीच वादाचे विषय ठरावेत. आर्गोच्या निवडीमुळे पुरस्कारांच्या निकषांबाबत राळ उडणं हे साहजिकच होतं. त्याहीपेक्षा जास्त टीका होतेय, ते सिनेमाने वास्तवाशी घेतलेल्या फारकती मुळे.

ऑस्कर पुरस्कारां मध्ये अमेरिकन मानसिकतेचे सिनेमे कायम वरचढ ठरतात. अमेरिकन राजकीय ध्येयधोरणांचा जगभरातील अर्थव्यवस्था आणि संस्कृतीवर परिणाम होत असतो. अनेकदा या धोरणांमध्ये लष्करी ताकदीच्या बळावर अन्य देशांमध्ये शांतता धोरण राबवणं असो नाही तर रिटेल दुकानांच्या माध्यमातून थेट अर्थव्यवस्था ताब्यात घेणं अशा गोष्टी असतात. अमेरिका आपलं दमदाटीचं हे धोरण कायम ठामपणे रेटत असते. अमेरिका जे काही ठरवते, ते जगभरातल्या जनतेच्या कल्याणाचा ठेका घेतल्याचा थाटात करते. या निर्णयाला विरोध होत नव्हता. तोवर त्यांची भाषा ही अमेरिका ही जणू सुपरनॅचरल पॉवर घेऊन उदयास आल्यासारखी होती. जेव्हा मिडल ईस्ट देशांतील तेलांच्या खाणी हाच अर्थव्यवस्थेचा कणा बनला तेव्हा मात्र अमेरिकेला संघर्षाला तोंड द्यावं लागलं. तिथूनच अरब राष्ट्र आणि अमेरिका अशा अघोषित युद्धाची सुरुवात झाली. त्यालाच पुढे इस्लाम विरुद्ध जग असं भयावह रूप मिळालं. मग आपण जे काही करतो आहोत. त्यात अमेरिकेला हे सगळं करण्यावाचून गत्यंतर नसल्याचं चित्र उभं केलं. त्यातूनच इस्लामी राष्ट्रांतील कारवायांची हेरॉइक चित्र उभी करण्याचे प्रकार सुरू झाले. अमेरिकन सरकार जे काही करते, ते योग्यच असल्याची बाजू मांडण्याचं काम हॉलिवूडच्या सिनेमांतूनही होत असतं. हे सगळं सांगण्याचं कारण इतकंच की, ओर्गोला मिळालेला सर्वोत्कृष्ट





सिनेमाचा पुरस्कार मिळण्यामागची मानसिकता समजून घेणं.

तेहरानमध्ये झालेल्या राजकीय घडामोडींच्या संदर्भातील हा सिनेमा. इराणमध्ये सीआयएच्या कारवायांमुळे भडकलेल्या इराणी दंगेखोरांनी ४ नोव्हेंबर १९७९ रोजी तेहरानमधल्या अमेरिकन दुतावासावर हल्ला केला. त्यात पन्नासहून जास्त लोकांना बंदी बनवण्यात आलं. सहा कर्मचारी मात्र तिथून निसटले. त्यांनी कॅनेडियन राजदूत केन टेलर यांच्या घरात आश्रय घेतला. तिथून बाहेर पडण्याचा काही एक मार्ग दिसत नव्हता. तेव्हा अँटोनियो मेंडीस या सीआयए अधिकाऱ्याने एक वेगळीच शक्कल लढवली. ती म्हणजे एका सिनेमाच्या चित्रीकरणाच्या निमित्ताने इराणमध्ये प्रवेश करण्याची. ते सहा कर्मचारी सिनेमाशी संबंधित आहेत. असं भासवून त्यांना इराणमधून सोडवण्यात आलं,अमेरिकेच्या इतिहासात ही घटना गाजली ती द ग्रेट एस्केप अबाऊट द कॅनेडियन केपर या विशेषणाने.

अमेरिकन स्वाभिमानाचा कणा असलेली गुप्तचर संघटना म्हणजे सीआयए. म्हणूनच ती सुटका सीआयएसाठी मोठ्या अभिमानाची गोष्ट होती. त्या घटनेनंतर अँटोनिओ मेंडीस यांना सर्वोच्च सन्मान देऊन गौरवण्यात आलं. मेंडीस यांनी या घटनेवर, नंतर 'द मास्टर ऑफ डिसगाइज' हे पुस्तक लिहिलं. त्या पुस्तकावरूनच २००७ मध्ये 'द ग्रेट एस्केप' हा लेख लिहिला गेला. तर लेमोंट जॉन्सन यांनी टीव्हीसाठी एस्केप फ्रॉम इराण-द कॅनेडियन केपर नावाने फिल्म बनवली. तर त्याच घटनेवर २४ वर्षांनी बेन अेफ्लेकने 'ओर्गो' बनवला.

प्रमुख भूमिका आणि दिग्दर्शक अशी जबाबदारी हाताळत बेन अेफ्लेकने, जॉर्ज क्लुनी व ग्रॅंट हेस्लेव यांच्यासह निर्माताही बनला. बेन अेफ्लेकने यात टोनी मेंडीस नावाने प्रमुख भूमिका केली आहे. सिनेमाचं नाव ओर्गो का आहे तर, सीआयए ज्या खोट्या चित्रपटाची घोषणा करते. त्याचं ते नाव आहे. तेहरानमधल्या त्या घटनेनंतर सीआयएचे

**(पान १७ वर)**



# क्लो• ज• अ• प

## अपयशी सिनेमा शताब्दी महोत्सव

**भारतीय** चित्रपटांची पायाभरणी दादासाहेब तोरणे आणि दादासाहेब फाळके यांनी केली. स्वाभाविकच भारतीय चित्रपट व्यवसायाला एक शतक पूर्ण झाल्याची दरवळ महाराष्ट्र सरकारने घ्यायचे ठरविले. त्यासाठी मार्च २०१२ मधे सादर केलेल्या महाराष्ट्र सरकारच्या अर्थसंकल्पात सिनेमा शतक साजरे करण्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

सांस्कृतिक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वर्षभर कोणते कार्यक्रम करायचे यासाठी समिती नेमण्यात आली. २ महिने बैठका घेऊन समितीने वर्षभराच्या कार्यक्रम निश्चित केला. जून-जुलैमहिना उजाडला तरी कार्यक्रम सुरू होण्याचे नांव नाही. हे कार्यक्रम करण्यासाठी शासनाने गोरेगांवच्या 'फिल्मसिटी'ची नेमणूक केली. पण मंजूर झालेले ५ कोटी रुपये 'फिल्मसिटी'ला मिळालेच नाहीत.

दरम्यान जुलै-ऑगस्ट मधे पाऊस न पडल्याने मराठवाडा भागांत दुष्काळ सुरू झाला. दुष्काळ खूपच तीव्र आहे. त्यामुळे बराच खल होऊन मुख्यमंत्र्यांनी ५ कोटीचे बजेट छाटून फक्त १॥ कोटी रुपयावर आणले.

फेब्रुवारी महिन्यांत प्रत्यक्ष कार्यक्रमांना सुरुवात झाली. त्यांतला महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे जुने २१ मराठी चित्रपट आणि ७ जुने हिंदी चित्रपट

असा २८ चित्रपटांचा महोत्सव ७ दिवस महाराष्ट्रातील ६/७ विभागात करायचा.

फाळके नाशिकचे म्हणून या महोत्सवाचा कार्यक्रम १४ फेब्रुवारी पासून नाशिकला सुरू झाला. मराठी चित्रपटांबरोबर हिंदी चित्रपट का? तर भारताचा चित्रपट व्यवसाय मुंबईत आरंभ झाला. आणि हिंदी भाषिक आजही मुंबईत म्हणजे महाराष्ट्रातच बनतात. म्हणून १००वर्षे साजरी करतांना मराठी बरोबरच हिंदी चित्रपटही दाखवायचे ठरले.

या २८ चित्रपटांचा पहिला महोत्सव नाशिकच्या टॉकीजमधे १४ फेब्रुवारीला सुरू झाला. चित्रपटांना तिकीट नाही. प्रेक्षकांना मोफत जुने चित्रपट पहायला मिळणार.

पण आश्चर्य म्हणजे चित्रपट पहायला नाशिकचे प्रेक्षकच आले नाहीत. ७०० सीटसच्या सर्कल टॉकीजमधे प्रत्येक खेळाला ४/५ प्रेक्षक उपस्थित राहिले.

प्रसिद्धी नाही. नीट जाहीरात नाही याचाही परिणाम होताच. प्रेक्षकांची ही मनस्थिती योग्य की अयोग्य हा चर्चेचा मुद्दा होई शकेल. पण चित्रपट म्हणजे मनोरंजन ही जी प्रेक्षकाची भूमिका आहे ती जुन्या चित्रपटांकडून कशी पूर्ण होणार?

यामुळे मोफत असूनही गर्दी झाली नाही. चित्रपटाचे शतक महोत्सवी वर्षाचे सर्व सामान्य प्रेक्षकाचे लेखी कांहीही मोल नाही हेच यावरून लक्षात येते.

भारताने चित्रपटांचा प्रारंभ ज्या महाराष्ट्रात झाला तेथे एक शतकानंतर खरीखुरी चित्रपट संस्कृती रुजलेली नाही हाच या अपयशाचा अर्थ म्हणावा लागेल.

## महिला दिग्दर्शक चित्रोत्सव

८ मार्च हा महिला दिन म्हणून युनोने १९७५ मधे जाहीर केल्यापासून भारतभर हा महिला दिन साजरा केला जातो. १९९० पर्यंत मुंबईसारख्या मोठ्या शहरातून साजरा होत असे. पण आता महानगर ऐवजी छोट्या शहरांतून तो साजरा केला जातो असे दिसते.

पुण्याच्या वृत्तपत्रातून काम करणाऱ्या महिलांनी 'आयाम' नांवाची संस्था स्थापन केली असून दरवर्षी ८ मार्चला 'आयाम' तर्फे महिला दिन साजरा केला जातो.

यावर्षी 'आयाम'ने महिला दिग्दर्शकाचे ६ चित्रपट आणि दोन डाक्युमेंटरी दाखवून ८ ते १० मार्च या तीन दिवसात यावर्षीचा महिला दिन साजरा केला.

८ मार्चला सई परांजपे दिग्दर्शित 'स्पर्श' चित्रपटाने या महोत्सवाचे उद्घाटन अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते आर्काइव्ह थिएटर मधे झाले. 'गंगूबाई' (हिंदी) प्रिया कृष्ण स्वामी, 'इंग्लीश विंग्लीश' (हिंदी)गौरी शिंदे, 'अमू' (हिंदी) सोनाली बोस, 'जापनीज वाइफ' (इंग्लीश) अपर्णा सेन आणि 'फिराक' (हिंदी) नंदिता दास असे ६ महिला दिग्दर्शकांचे चित्रपट आणि सुहासिनी मुळये दिग्दर्शित ब्रम्हवादिनी आणि निशिता जैनची गुलाबी गँग या डाक्युमेंटरी दाखवण्यातं आल्या. या खेरीज यावर्षी 'सत्यजित राय आणि मन्वंतर' या पुस्तकाच्या महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट समीक्षेचा वा. ल. कुलकर्णी पारितोषिक मिळाले या निमित्त लेखिका श्यामला वनारसे आणि चित्रपट समीक्षिका दीपा गेहलोत यांचा सत्कार करण्यात आला.

'आयाम' चा हा उपक्रम निश्चितच अभिनंदनीय आहे.

**— कॅमेरावाला**

# ट्रॉम्सो आंतरराष्ट्रीय महोत्सव

**● संतोष पाठारे**

**नॉर्वे** देशातील ट्रॉम्सो हे बर्फाच्छादित टुमदार बेट! ट्रॉम्सोला चित्रपट संस्कृतीची सुमारे शंभर वर्षांची परंपरा आहे. १९१५ साली बांधलेलं 'किनोमॅटोग्राफ' हे थिएटर आजही ट्रॉम्सोला दिमाखात उभं आहे. फिल्म सोसायटी सदस्य, तरुण व बालकांसाठी आयोजित करण्यात येणारे चित्रपट महोत्सव, चित्रपट आस्वादनाच्या तसंच फिल्ममेकिंगच्या कार्यशाळा, अशा अनेक चित्रपटविषयक घडामोडी तिथे वर्षभर सुरू असतात. ट्रॉम्सो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा त्यापैकीच एक प्रमुख कार्यक्रम. मार्था ओटे यांच्या नेतृत्वाखाली पार पडणाऱ्या टॉम्सो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं यंदाचं तेविसावं वर्ष! या महोत्सवाला आंतरराष्ट्रीय फिल्म सोसायटी फेडरेशनचा ज्युरी म्हणून उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली व त्यानिमित्ताने युरोप मधील चित्रपट महोत्सव संस्कृतीही जवळून पाहता आली.

१३ जानेवारी ते २० जानेवारी या दिवसांमधे या चित्रपट महोत्सवाचं आयोजन केलं जातं. (२० जानेवारीपासून ट्रॉम्सोत सूर्यदर्शन व्हायला सुरूवात होते. त्याचं औचित्य या निमित्ताने साधलं जातं!) महोत्सवाचं औपचारिक उद्घाटन १४ जानेवारीला होतं व समारोप १९ जानेवारीला केला जातो. पुरस्कार विजेते चित्रपट प्रेक्षकांना पाहता यावेत म्हणून त्याचे विशेष खेळ वीस जानेवारीला आयोजित केले जातात.

ट्रॉम्सो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात स्पर्धा विभागात अकरा चित्रपटांची निवड करण्यात आली होती. त्यात 'फिल्मीस्तान'या नितीन कक्कर दिग्दर्शित भारतीय चित्रपटाचा समावेश होता. फिल्मीस्तानचं कथानक भारत-पाक सीमेवरील एका छोट्याशा खेड्यात घडतं. चित्रपटाचा नायक हिंदी सिनेमात



**फिल्मसोसायटी ज्युरी : ओड ऑरींड, संतोष पाठारे आणि जार्जियाची टिया गॉबिडझिली**



हिरोगिरी करायला आलेला आहे. गैरसमजामुळे तो पाकिस्तानी अतिरेक्यांकडून पकडला जातो व त्याला पाकिस्तानमधील खेड्यातील एका घरात डांबलं जातं. या घरातील तरुण भारतीय हिंदी चित्रपटांच्या पायरेटेट डिव्हीडी विकण्याचा धंदा करत असतो. या तरुणाने नायकाच्या सुटकेसाठी केलेल्या प्रयत्नांवर हा चित्रपट आधारीत आहे. चित्रपटात येणारे बॉलीवूडचे (तिथे 'माय नेम इज खान' मुळे शाहरूख खान ओळखीचा आहे. मात्र बॉलीवूड म्हणजे हाणामारी व गाणी एवढीच भारतीय चित्रपटांची ओळख त्यांना आहे!) तरी सीमेवर राहणाऱ्या लोकांची मानसिकता युरोपियन प्रेक्षकांना हेलावून गेली. 'फिल्मीस्तान'ला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बॉलीवूड व एकूणच भारतीय चित्रपट सृष्टीबद्दल उत्सुकता निर्माण करण्यात 'फिल्मीस्तान' यशस्वी ठरला. माझ्या समवेत असणाऱ्या ओड ऑरिल्ड कुसेन (टॉम्सो) व टिया गॅबिड्झिली (जॉर्जिया) या ज्युरींनी फ्रान्सच्या फ्रान्स्वाँ ओझोन या दिग्दर्शकाच्या 'इन द हाऊस' या चित्रपटाची डॉन क्वीझोट पुरस्कारासाठी निवड केली. विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढीस लावताना शिक्षकाचे झालेले नैतिक अध:पतन चित्रित करणारा हा चित्रपट फ्रान्स्वा ओझोनच्या अलौकीक प्रतिमेचा अविष्कार घडवतो. वास्तव व कल्पना यांच्या सीमारेषा धूसर करत करत ओझोनने इन द हाऊस मधे आपल्या वैयक्तिक आयुष्यातील विसंगतीवर, अपुरेपणावर व इतरांच्या सुखी जीवनामुळे आपल्या मनात निर्माण होणाऱ्या असूयेवर मार्मिकपणे टिपण्णी केली आहे.

ट्रॉम्सो आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मुख्य पारितोषिक म्हणजे अरोरा अवॉर्ड ऑस्ट्रेलियाच्या केट शॉर्टलेन्ड या दिग्दर्शिकेच्या 'लोरा' या चित्रपटाने पटकावलं. हिटलरच्या अस्तानंतर त्याच्या सैन्यातील प्रमुख अधिकाऱ्यांवर ओढावलेल्या परिस्थितीचे मुलांच्या नजरेतून केलेलं चित्रण हे लोरा चं आशयसूत्र कॅमेऱ्यांचा अप्रतिम वापर व लहान मुलांचा नैसर्गिक अभिनय यामुळे 'लोरा' अविस्मरणीय ठरला.

लोमी लोस्की या फ्रेन्च दिग्दर्शिकेच्या कॅमिली रिवाइन्ड' या खुमासदार 'टाईम मशिन'ची संकल्पना असणाऱ्या चित्रपटाची निवड आंतरराष्ट्रीय समीक्षकज्युरींनी केली.

पावलो लॅरैनच्या 'नो' या चित्रपटाची निवड प्रेक्षकांनी महोत्सवातील सर्वोत्तम चित्रपट म्हणून केली. १९८८ साली चिली देशातील सर्वेसर्वा जनरल ऑगस्टो पिनोचेटच्या विरोधात जनतेने केलेल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवरील हा चित्रपट त्या काळातील जनता कलासक्त माणसं व जनतेने 'नो' व्होटिंग करावं यासाठी केलेली ॲड कॅम्पेन याचं डॉक्युड्रामा पद्धतीनं चित्रित करण्यात आला होता.

स्पर्धा विभागातील चित्रपटांखेरीज इतर सत्तर आंतरराष्ट्रीय चित्रपट. महोत्सवात राबवले गेले. 'गुलाबी गँग' हा निशिता जैन या भारतीय दिग्दर्शिकेचा माहितीपट, अपंगाच्या लैंगिक इच्छा पुरवणाऱ्या वेश्यांच्या आयुष्यावरील 'स्कारलेट रोड' हा माहितीपट महोत्सवात चर्चेचा विषय होते.

चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांचा सुसंस्कृतपणा हा महोत्सवाचा विशेष होता. खेळाआधी पाच मिनिटं स्थानापन्न होणं. चित्रपट सुरू असताना आपल्या

**(पान १४ वर)**



# अभिनंदन

**‘सत्यजित राय आणि भारतीय मन्वतर’**

ही लेखमाला श्यामला वनारसे यांनी ‘रुपवाणी’त लिहली होती. त्यावरील पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचे या वर्षीचे उत्कृष्ट समीक्षेचे वा. ल. कुळकर्णी पारितोषिक मिळाले आहे. श्यामला वनारसेंचे अभिनंदन!

**आता नवीन लेखमाला**

## करमणूक : चार घटका ते चोवीस तास

**लेखिका श्यामला वनारसे**

भारतीय सिनेमाची शंभर वर्षे गेल्या वर्षभरात अनेकानेक प्रकारे साजरी होत आहे. त्यात कौतुकाचा गौरवाचा भाव मोठा होता.

एक समाज म्हणून पश्चिमेकडून आलेले हे वैज्ञानिक माध्यम समोर आल्यापासून भारतीय कलाकार आणि रसिक यांचा प्रतिसाद कशा प्रकारचा बनत गेला किंवा कसा घडवला गेला याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न या नव्या लेखमालेंत आहे.

या माध्यमाचा थेट संबंध आधुनिकीकरणाशी शहरीकरणाशी आणि भारतातील जनप्रिय संस्कृतीच्या निर्मितीशीही आहे.

या सर्व व्यापक घटितांमधे करमणूक ही गोष्ट चार घटकांची न राहता चोवीस तासांची झाली. गंमत आणि विरंगुळा या माफक अपेक्षांपासून कलात्मक जीवनदर्शनाच्या शोधाच्या विकासापर्यन्त झाली याचाही विचार या मालिकेच्या निमित्ताने केला जाणार आहे.

**ही लेखमाला एप्रिल १३ पासून रुपवाणीत सुरू होत आहे.**

# स्पेशल २६

**(हिंदी/ २०१३/ १३९ मि.)**

**दिग्दर्शक - नीरज पांडे**

कलाकार -अक्षय कुमार, अनुपम खेर,किशोर कदम,काजल अग्रवाल, राजेश शर्मा, जिम्मी शेरगील, मनोज वाजपेयी

**एखाद्या** दिग्दर्शकाचा पहिलाच चित्रपट लोकप्रिय ठरला आणि विविध कारणांनी चर्चेत राहिला की स्वाभाविकच त्याच्या आगामी चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना अधिक उत्सुकता लागून राहते. याचवेळी प्रेक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करणे किंबहुना आधीच्या चित्रपटांच्या गुणवत्ते इतपत दुसऱ्या चित्रपटाचा दर्जा राखणं हे त्या दिग्दर्शकापुढील खरं आव्हान असतं. हे आव्हान स्वीकारून आपल्या मनाजोगत्या विषयावर तब्येतीत काम करून चित्रपट निर्मिती करणं व प्रेक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करणं हे फार थोड्या दिग्दर्शकांना जमून येतं. 'स्पशेल छब्बीस' पाहिल्यानंतर नीरज पांडे या कसोटीस पूर्ण उतरल्याचा प्रत्यय येतो.

२००८ साली प्रदर्शित झालेल्या 'ए वेन्सडे'ने सर्व प्रथम नीरज पांडेला प्रकाश झोतात आणलं. १९ जुलै २००६ ला मुंबईत झालेल्या बॉम्ब स्फोटाच्या पार्श्वभूमी वरील एक पिडीत अनाम मुंबईकरांची थरारक कथा मांडणारा 'ए वेन्सडे' अनेक कारणांनी गाजला. नासिरुद्दीन शहा व अनुपम खेर यांच्या प्रभावी भूमिका, थरारक असूनही बॉम्बस्फोटात मारल्या गेलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकाच्या व्यथेला संवेदनशीलपणे हाताळणारा हा चित्रपट काहींना अतर्क्य वाटला तर काहींना तो अनाम नायक आपला प्रतिनिधी वाटला. या सर्व कारणांमुळे 'ए वेन्सडे'ला लोकप्रियता मिळाली व सामाजिक विषय हाताळणारा सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून राष्ट्रीय पारितोषिक देखील मिळाले. नीरज पांडेच्या या कर्तृत्वावर 'स्पेशल छब्बीस'च मूल्यमापन करायचं झालं तर त्यात सामाजिक संदेश किंवा संवेदनशील हाताळणी हे घटक



अनुपस्थित आहेत. अर्थात दिग्दर्शकाने आपल्या प्रत्येक कलाकृतीतून सामाजिक संदेश वगैरे देणं अपेक्षितही नाही. मात्र तरीही काही बाबतीत 'स्पेशल छब्बीस'ची 'ए वेन्सडे' बरोबर तुलना करता येईल. 'स्पेशल छब्बीस' थरारक आहे. नीरज पांडेनी पहिल्या दृश्यापासून पकड घेणारी पटकथा रचली आहे. त्यातील प्रत्येक व्यक्तिरेखेला विशिष्ट आलेख आहे. पुढे काय होणार? ही उत्सुकता चित्रपटाच्या शेवटापर्यंत (त्यातील छोट्याशा रहस्याचा अंदाज बांधता आला तरीही!) प्रेक्षकांना खिळून ठेवते. 'स्पेशल छब्बीस'चं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यातील प्रमुख भूमिकेत अक्षय कुमार हा आजच्या सुपरस्टार असला तरीही त्याच्या बरोबरीनेच अनुपम खेर, मनोज वाजपेयी, जिमी शेरगील, किशोर कदम या सर्व सहकलावंताच्या व्यक्तिरेखेला सारखंच महत्त्व आहे. त्यामुळे हा चित्रपट केवळ अक्षय कुमारचा रहात नाही. हे श्रेय अर्थात दिग्दर्शकाचं आहे. 'स्पेशल छब्बीस'चं कथानक ऐंशीच्या दशकात घडलेल्या एका सत्यघटनेवर आधारीत आहे. आपण सी.बी.आय.चे ऑफिसर आहोत अशी बतावणी करून अजय (अक्षय कुमार), पी.के.शर्मा (अनुपम खेर), इक्बाल (किशोर कदम) आणि जोगिंदर (राजेश शर्मा) ही चौकडी धनिकांकडे असलेला काळा पैसा राजरोसपणे लुटत असते. त्यांनी टाकलेल्या एका धाडीमुळे पोलिस अधिकारी रणवीर सिंग (जिम्मी शेरगील) वर बडतर्फ होण्याची पाळी येते. तो आपल्यावर आलेला ठपका दूर करण्यासाठी तो वसीम खान (मनोज वाजपेयी) या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याची मदत घेतो. धाड टाकल्यानंतर वेगवेगळ्या शहरात जाऊन आपलं रोजचं आयुष्य सुखानं जगण्याची ही चौकडी मुंबईतील एका मोठ्या जवाहिऱ्याच्या दुकानांवर धाड घालण्याचं ठरवतात. वर्तमानपत्रात जाहिरात देऊन. इन्कम टॅक्स ऑफिसर पदासाठी मुलाखती घेऊन सव्वीस लोकांना ट्रेनिंग देतात. यावेळी वसिम खान त्यांच्या मागावर असतो. वसिम खान या चौकडीला जेरबंद करतो की ही चौकडी त्याच्या प्रयत्नांवर पाणी फिरवते? हा उत्कंठावर्धक उत्तरार्ध प्रत्यक्षात अनुभवायला हवा. दिग्दर्शकाने अजय आणि त्याच्या सहकाऱ्यांनी घातलेल्या धाडीचं चित्रिकरण पार्श्वसंगीताच्या मदतीनं अधिक वेधक केलंय. वसीम खानची व्यक्तिरेखा ठळक करण्यासाठी योजलेला प्रसंगही प्रेक्षकांना श्वास रोखून ठेवायला भाग पाडतो. दिल्लीतल्या रस्त्यावर एका गुन्हेगाराचा वसिम खानने केलेला पाठलाग त्याच्या पुढच्या कर्तृत्वाला पूरक ठरतो. अजय, पी. के. शर्मा, इक्बाल आणि जोगिंदर हे कारस्थान करून बनावट धाडी टाकत असले तरीही त्यानंतर त्याचं सामान्य आयुष्य जगणं, कुटुंबात रमणं यामुळे स्वाभाविकच प्रेक्षकांची सहानुभूती या चौकडीच्या बाजूनेच राहते. ऐंशीच्या दशकात निर्माण झालेल्या गुन्हेगारीचं उदात्तीकरण करणाऱ्या अनेक हिंदी चित्रपटांचा प्रभाव 'स्पेशल छब्बीस' वर असला तरीही नीरज पांडेनी गुन्हेगाराचं कुटुंबवत्सल असणं छोट्या छोट्या प्रसंगातून मांडलय. अजयचं प्रिया (काजल अग्रवाल) बरोबरचं प्रेमप्रकरण ही व्यावसायिक चित्रपटाची गरज म्हणून येतं. त्यानिमित्ताने येणारी गाणी ही फारशी श्रवणीच नाहीत, मात्र अजयची प्रेमकथा दिग्दर्शकाने थोडक्यात आवरून तिचा शेवटाला साजेसा उपयोग करून घेतला आहे.

'स्पेशल छब्बीस' हा प्रेक्षकांचे दोन घटका मनोरंजन करणारा, फिलगुड गुन्हेगारीपटांची परंपरा सांभाळणारा चित्रपट आहे. प्रेक्षकांना तो आवडला तर त्याच्या सिक्वेलचे सूतोवाच दिग्दर्शकाने शेवटाकडे करून ठेवलेलच आहे.

**-संतोष पाठारे**

कारण त्यामुळेच या विषयाला शास्त्रीय बैठक व त्याचे गांभीर्यही प्राप्त होते. परंतु शैक्षणिक चौकटीच्या बाहेर, अन्य सामाजिक-सांस्कृतिक व्यवहारांतूनही चित्रपटसाक्षरता होणे गरजेचे आहे. वर्तमानपत्रे-साप्ताहिके-मासिके आदींतून चित्रपट परीक्षणे-समीक्षालेख-मुलाखती व अन्य लेख यांतून समाजाची चित्रपट विषयक दृष्टी घडवता येईल. रेडिओ, दूरचित्रवाणी-इंटरनेटवरील वेबसाईटस-ब्लॉग्ज इत्यादी माध्यमांतूनही हे साध्य करता येईल. चित्रपट व्यावसायिक दृष्टीतून बनत असले, तरी त्याकडे बघण्याची सम्यक-संतुलित दृष्टी देण्याची जबाबदारी फिल्म सोसायटीजकडे आहे. एक काळ असा होता, की लोकांपर्यंत अनेक उत्तमोत्तम चित्रपटच पोहोंचू शकत नव्हते. ते त्यांच्यापर्यंत पोहोंचविणे हेच एक मोठे जिकीरीचे काम होते. परंतु आज तंत्रज्ञानाच्या जागतिकीकरणामुळे, चित्रपटांची उपलब्धता सहजसाध्य झाली आहे. विविध दूरचित्रवाणी वाहिन्या आणि इंटरनेटमुळे चित्रपट सहज उपलब्ध झाले आहेत. फेस्टिवल्सची संख्याही वाढते आहे. तेव्हा फिल्म सोसायटीजचे काम केवळ चित्रपट प्रदर्शन हे नसून जबाबदार प्रेक्षक घडवणे हे आहे, आणि त्यासाठी चित्रपटसाक्षरतेचे विविध उपक्रम राबवणे गरजेचे आहे. भारतात, शैक्षणिक चौकटीत चित्रपटाला आजही फारसे स्थान नाही. नजिकच्या काळात त्याला प्रतिष्ठा मिळेल, अशी आशा करायला हरकत नाही. पण ब्रिटीश फिल्म इन्स्टिट्यूटसारख्या स्वायत्त संस्थेने चित्रपट साक्षरतेसाठी मोठेच योगदान दिले आहे. तेच काम आज फिल्म सोसायटीजचे आहे. फिल्म सोसायटी ही रसिकांची चळवळ आहे. चित्रपट हे कलामाध्यम आहे, अशी साक्षेपी दृष्टी या चळवळीत आहे. चित्रपट साक्षरतेसाठी छोटी-मोठी शिबीरे, अभ्यासक्रम, परिसंवाद, परिषदा, कार्यक्रम, विविध माध्यमांतून या विषयावर चर्चा घडवणे हे तर व्हायलाच हवे परंतु चित्रपटविषयक जे विचारमंथन जगभर झाले आहे-चालू आहे, ते आपल्या स्थानिक भाषेत उपलब्ध व्हावे, केवळ अनुवादक नाही तर उत्तम या क्षेत्रात विचारवंत निर्माण व्हावेत, त्यांचे मौलिक लेखन प्रकाशात यावे यासाठी व्यवस्थात्मक पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. फिल्म इन्स्टिट्यूट, फिल्म आर्काईव्हज, फिल्म फेस्टिवल्स, एनएफडीसी, फिल्मस डीव्हीजन - यांबरोबरच फिल्म सोसायटीज आदींनी संस्थात्मक व्यवहारातून चित्रपट साक्षरतेची एक 'व्यवस्था' उभारली, त्यासाठीचे पोषक वातावरण तयार केले, तर आपल्याही शाळा-विद्यापीठांतून चित्रपट अभ्यासाच्या दिशेने पावले पडतील. 'रुपवाणी' हे नियतकालिकदेखील गेली २० वर्षे याच दिशेने प्रयत्नरत आहे. ● (समाप्त)

---

**पान ८ वरून**

मोबाईल्सचा अजिबात वापर न करणं आणि चित्रपट पसंतीस उतरला नाही तरी तो संपल्यानंतर टाळ्या वाजवून दिग्दर्शकाला दाद देणं हा प्रेक्षकधर्म कसोशीनं पाळणारे प्रेक्षक खऱ्या अर्थानं चित्रपट संस्कृतीचे पाईक आहेत. आठ दिवसाच्या महोत्सवाचं नेटकं आयोजन (कोणताही खेळ रद्द वगैरे झालाच नाही!) विना मोबदला महोत्सवासाठी काम करणारे तीनशे आबालवृद्ध स्वयंसेवक लहानग्यांसाठी थिएटरच्या आवारात आयोजित केलेले स्नो शो, उद्घाटन प्रसंगी ट्रॉम्सोचे मेयर व नार्वेच्या सांस्कृतिक मंत्र्यांनी केलेली मोजक्या शब्दातली खुमासदार भाषण आणि मार्था ओटे यांनी सर्वप्रथम आपल्या सहकाऱ्यांचे आभार मानून महोत्सवाच्या सुरूवातीस आपल्या मनमोकळ्या स्वभावाचे केलेले दर्शन यामुळे उणे आठ डिग्री सेंटिग्रेड तापमानात आयोजित केलेला ट्रॉम्सो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव माझ्यासाठी एक 'उबदार' अनुभव ठरला. ●●●

# सिनेमासंस्कृती आणि फिल्म सोसायटी चळवळ

(मागील अंकावरून)

-मनोज कुलकर्णी

● १९५० ते १९६० हे दशक जगभर सिनेमाचे सुवर्णदशक म्हणून मानले जाते. या दशकात हिंदीत बिमल रायचा- 'दो बिघा जमीन', गुरुदत्तचा- 'प्यासा', व्ही. शांताराम यांचा 'दो आँखे बारह हाथ' आणि सत्यजित राय यांचा 'पथेर पांचाली', राज कपूरचा 'जिस देश में गंगा बहती है', हृषीदा यांचा 'अनुराधा' आणि दशकाच्या शेवटी आलेला के. आसिफचा 'मुगल-ए-आझम' या चित्रपटांनी भारतीय सिनेमाचे विविध पैलू पुढे आले. 'पथेर पांचाली'चा अपवाद वगळता इतर चित्रपट हे प्रेक्षक-अभिरुचीच्या चौकटीतच होते.

● १९६० आणि ७० च्या दशकात सिनेमात मुख्य कथेच्या जोडीला बाष्फळ कॉमेडी ट्रॅक जोडलेला असायचा, बऱ्याचदा सुमार दर्जाचा विनोद त्यांत मेहमूद, जॉनी वॉकर, आगा, मुक्री, असे विनोदी नट पडद्यावर आले. नंतर त्यांचे भाईबंद प्रादेशिक चित्रपटात आले. या काळातले सगळेच सिनेमे टाकाऊ नव्हते, पण पठडीबाहेरच्या सिनेमाची तहान मात्र शमत नव्हती, हे मान्य करावं लागतं. परंतु याच काळात हिंदी सिनेमाची पठडी सोडून पहिला हिंदी समांतर सिनेमा निर्माण करण्याचे श्रेय १९६९ सालात आलेल्या 'भुवन शोम'चे दिग्दर्शक मृणाल सेन यांच्याकडे जाते. १९८० नंतरच्या सिनेमात कॉमेडी ट्रॅक अभावानेच दिसला. एकविसाव्या शतकाच्या आरंभी गाण्यांची संख्या आठ-दहावरून चार-पाचपर्यंत आली.

भारतीय सिनेमाचे स्वरूप परंपरागत तेच का राहिले असावे? याचे उत्तर सिनेमाच्या आधी रुजलेल्या रूढी परंपरा प्रचलित भारतीय संस्कृती यांत सापडते. देव म्हणजे कथेचा नायक आणि त्याच्या विरोधात असणारे सर्वच नालायक खल-नायक असेच बिंबविले गेले असल्याने सिनेमात याचे दर्शन घडणे ओघाने आलेच. दिसायला सुंदर या सदरात मोडणारे नट आणि नट्या, हे नायक आणि नायिका, आणि जरा सहन होतील इतबत बरे, पण तुलनेने कुरूप, असे खलनायक (प्राण आणि अजित यांचा अपवाद वगळून) देवांच्या दरबारात ज्याप्रमाणे अप्सरा रंभा, उर्वशी, मेनका या नृत्य सादर करायच्या, तेच चित्रपटात गाण्यांच्या रूपात आलं. आणि कथानक म्हणजे सत्य आणि असत्य यातले झगडे. भारतीय सर्वसामान्य प्रेक्षक हा वृत्तीने परंपरावादी राहिल्याने भारतीय चित्रपट बहुतांशी तसाच निर्माण झाला.

युरोपातल्या प्रबोधनपर्वामुळे तेथे जसे वैज्ञानिक विचार, मानसशास्त्रीयदृष्ट्या व्यक्तीचे सामाजिक महत्त्व, स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व, ग्रंथोक्त सत्याच्या विरोधातले विचारवंतांचे माणूसपण बहाल करणारे प्रबोधनपर विचार मान्य करण्याचा पारदर्शीपणा, त्याच जोडीला कालानुरूप विकसित होत जाणारी लोकशाही, यामुळे तेथे वास्तववाद रूजला आणि तो प्रगल्भतेने तेथील प्रतिभावान साहित्यिकांनी संहिता लिहून समोर आणला तर तो दिग्दर्शकांनी सिनेमा या कलेतून पडद्यावर आणला. त्यामुळेच तर हॉलीवूडपेक्षाही वेगळे विषय असणारे चित्रपट युरोपात निर्माण झाले. सध्या भारतीय सिनेमागृहात प्रदर्शित होणारे हॉलीवूडचे बहुतांशी सिनेमे हे अतिविकसित तंत्राचा मानवी समाजाशी घेणं देणं नसलेले तंत्राधिष्ठित आविष्कार असे खेदाने म्हणावे लागतेय. कारण नव्या हॉलीवूडचा हात सिनेमासंस्कृती पासून सुटताना दिसतोय. जागतिक

सिनेमाचा विचार करताना आशिया आणि मध्यपूर्वेतून येणारे वेगळ्याच वाटा चोखाळणारे विषय आणि चित्रपट यांच्याकडे अभ्यासू नजरेने पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

रेनेसान्स ते एकविसावे शतक अशा प्रदीर्घ कालखंडाचा विचार करताना आधुनिक मनुची मानसिकता विचारवंतांनी काळाच्या कसोटीवर विविध निकष लावून तपासली पाहिजे. कारण यातूनच चित्रपटांचे वेगवेगळे विषय, आशय आणि तंत्रे विकसित होतील. म्हणूनच या माध्यमाशी संबंधित असलेल्या सर्व कलांमधील कालानुरूप बदलांचा सूक्ष्म अभ्यास करुन मगच या माध्यमावर हुकूमत असणाऱ्यांना भानावर राहून निर्मिती करता यावी यासाठी पोषक वातावरण घडवावे लागेल. येऊ घातलेल्या दिग्दर्शकांचा वेध चळवळीला घ्यावा लागेल, त्यांची वाट कशी सोपी करता येईल याचा विचार करावा लागेल, त्याचबरोबर या नव्या बदलांशी सभासदांची नाळ चळवळीशी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य चित्रपट चळवळीला सतर्क राहून करावे लागेल. त्यात बाजारू काय आणि कलात्मक, प्रायोगिक, समांतर काय हे पारखून घ्यावे लागेल. त्यातून नवे निकष सामोरे येतील आणि इतिहासाच्या पहिल्या पन्नास-शंभर वर्षातील महान दिग्दर्शकांवरच चित्रपटचळवळीचे काम भागायचे नाही हे नव्याने समजून घ्यावे लागेल.

कारण एखादी चळवळ रुजणे-वाढणे ही मुळातच वेगळी प्रक्रिया आहे. चळवळीचे अस्तित्व हेच कशाच्या तरी विरोधात आहे, हा पहिला प्रश्न, त्याचे उत्तर असे आहे. फिल्म-सोसायटी चळवळ ही बाजारू गल्लाभरू चित्रपटांच्या विरोधात आहे आणि कलात्मक, समांतर, वास्तववादी चित्रपटाच्या बाजूची आहे. ज्या दिवशी या साऱ्याचा विचार आमच्या येथील प्रतिभावान साहित्यिक, विचारवंत, कलावंत आणि दिग्दर्शक करतील आणि असा वेगळा मार्ग चोखाळणाऱ्या सिनेमासृष्टीतल्या व्यक्तींच्या मागे समाज उभा राहील, त्या दिवशी सिनेमासंस्कृती खऱ्या अर्थाने रुजली, असे म्हणावे लागेल.

सिनेमासंस्कृती समजून घेण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे फिल्म सोसायटीचा सभासद होऊन सिनेमाक्षर होणे, त्याचबरोबर चळवळीत कार्यरत होणे हा आहे. कारण चित्रपट हे आंतरराष्ट्रीय कलामाध्यम आहे. आणि ही जाणीव निर्माण करून प्रेक्षकांची अभिरुची या नव कलामाधध्यमासाठी उंचावणे, ही या चळवळीची प्रेरणा आहे. सिनेमा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून साहित्य, संगीत, नृत्य आणि शिल्पकला याप्रमाणे कलामाध्यम आहे, ही जाणीव सदस्यांमध्ये निर्माण करणे, हे फिल्म सोसायटीचे चळवळीचे उद्दिष्ट आहे.

'परिवर्तनाचे वाटसरू' मधून साभार ●

(समाप्त)


प्रभात चित्र मंडळाचे मासिक वास्तव रूपवाणी

**वार्षिक वर्गणी १००रु.**
**प्रभात सदस्य वा.व. ५० रु.**
**अन्य फिल्म सोसायटी**
**सदस्य वा.व. ७५ रु.**
**पाच वर्षांची ४००रु.**

वर्गणी **प्रभात चित्र मंडळ** या नावे मनी ऑर्डर अथवा डीडीने पाठवावी. बाहेरील गावचे चेक स्वीकारले जाणार नाहीत.

**प्रभात चित्र मंडळ :** शारदा सिनेमा, पहिला मजला, दादर, मुंबई-४०००१४.

**(पान ४ वरून)**
अधिकारी जेव्हा कॅनेडियन अधिकाऱ्यांच्या घरात आश्रय घेतात. त्यांना सोडवताना परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता असते. त्यांच्या जीवाला धोका असतो. सीआयएच्या मुख्य कार्यालयात तातडीची बैठक बोलावली आहे. त्यात सुटकेचे अनेक मार्ग सुचवले जातात. उच्चपदस्थ अधिकारी मात्र त्यातले धोके लक्षात घेऊन नाकारतात.

कोणताही तोडगा न निघता बैठक संपते. त्यानंतर मेंडीस आपल्या मुलाला फोन करतो. त्याला सहज विचारतो की तो काय करतोय. तेव्हा मुलगा उत्तरतो. टीव्हीवर प्लॅनेट ऑफ द एप बघतोय. मेंडीसला सुचतं की, एखाद्या सिनेमाच्या शुटिंगच्या निमित्ताने आपण इराणमध्ये पोहोचायचं. आधी मेंडीसला विरोध होतो. नंतर मात्र परवानगी दिली जाते. मग स्टार वॉर्ससारखी एखादी सायन्स फिक्शन सुरू करण्याची तयारी सुरू होते. त्यासाठी हॉलिवूडमधल्या कलाकारांना बोलावलं जातं. त्यात सायन्स फिक्शनसाठी काम करणारा मेकअप आर्टिस्टही मदतीला घेतला जातो. सिनेमाची चर्चा व्हावी. यासाठी प्रमोशन केलं जातं. मेंडिसाला हाताशी धरलं जातं. प्रत्यक्षात असा सिनेमा तयार होणार नसतो. काहींना तशी कल्पना देत, तर काहींना तसं न सांगता मेंडीस प्लॅन आखतो. सिनेमाच्या शुटिंगसाठी अनेक देशांमधल्या लोकेशन्सला भेट देण्यात येत असल्याच्या बातम्या पसरवल्या जातात.

सिनेमाचा क्रू मेंबर बनून इराणमध्ये पोहचलेला मेंडीस परिस्थितीचा अंदाज घेतो. त्या सहा जणांची भेट घेऊन सुटकेची तयारी करतो. सुटकेची तयारी म्हणजे ते सहा जण ओर्गोचे कलाकार, दिग्दर्शक, कॅमेरामन असल्याची तालीम करून घेतो. शेवटच्या क्षणी मेंडीसला आपलं मिशन रद्द करून परतीचा मार्ग धरण्याचे आदेश मिळतात. त्या सहा जणांना विमानतळावर पकडण्यात आलं. तर आपली छीथू होईल, या भीतीने हा निरोप दिलेला असतो. मेंडीस मात्र जर काही झालंच तर त्याची जबाबदारी फक्त त्याचीच असेल, असं सांगून टाकतो. मेंडीस ठरल्याप्रमाणे सहा जणांना आपल्या व्हॅनमधून घेऊन बाहेर पडतो. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत हे मिशन पूर्ण होण्याची शक्यता नसते. अखेर मेंडीसची मोहीम फत्ते होते.

ही झाली सिनेमाची कथा प्रत्यक्षात ही घटनाच अत्यंत नाट्यपूर्ण होती. ही घटना घडली ती राष्ट्राध्यक्ष जीम कार्टर यांच्या कारकिर्दीत. खरं तर या सुटकानाट्यात सीआयएची भूमिका नखाएवढी होती. सारे प्रयत्न केले ते कॅनडा सरकारने. अगदी तेहरानमधल्या त्यांच्या राजदूताच्या घरी त्या सहा जणांनी आसरा घेतल्यापासून सुटका होण्यापर्यंतची जोखीम उचलली होती. ती कॅनेडियन सरकारने. सिनेमात कॅनडाचे राजदूत केरी टेलर यांच्या या असामान्य कामगिरीचा आभासही होऊ दिलेला नाही. केरी टेलर सिनेमात केवळ निरोप देण्या-घेण्याचं काम करतात. सिनेमा जेंव्हा ऑक्टोबर २०१२ मध्ये कान्स महोत्सवात दाखवला गेला तेव्हाच त्याविषयी नाराजी व्यक्त केली गेली. टेलर यांनी. कॅनडा सरकारने केलेल्या प्रयत्नांना डावलल्याविषयीची नाराजी उघडपणे बेनच्या कानावर घातली. त्यामुळेच नंतर पटकथेत थोडा बदल करत कॅनडा सरकारच्या सहकार्याचा उल्लेख करण्यात आला.

सीआयएचा सहभाग अल्प असूनही सिनेमात सुटकेचं सगळं श्रेय त्यांनाच देण्यात आलं. सीआयएच्या कारवाईला ग्लॅमरस केल्याबद्दलही आक्षेप घेण्यात आला. पण त्याही पुढे जाऊन सगळ्यात मोठा आरोप झालाय तो म्हणजे हा सिनेमा बनवण्यासाठी खुद्द सीआयएने पुढाकार

घेतल्याचा बेन अॅपलेकला सिनेमा करण्यासाठी राजी करून घेतलं गेलं. बेन आणि निर्माता क्लुनी दोघेही अभिनेते डेमोक्रॅटीक पक्षाचे उघड समर्थक आहेत. क्लुनीचे सुदानमधल्या डार्फर संघर्षात निर्वासितांना न्याय मिळवून देण्यासाठी झालेल्या निदर्शनात भाग घेणं. समलिंगी विवाहाविषयीचं मत असो, त्याच्यातल्या राजकारण्याची भूमिका ठळकपणे उघड झालीय, राजकारण आणि कलाकार यांच्यातली सीमारेषा अगदी पुसट असल्याचं बेननेही जाहीरपणे बोलूनही दाखवलंय. शिवाय या दोघांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा लपून राहिलेल्या नाहीत. अनेकदा गर्व्हनरपदासाठी या दोघांचं नावही चर्चिल गेलंय. खरंखोट त्या दोघांनाच माहीत पण तरीही अशा शंकांना या सिनेमामुळे बळ मिळालंय.

खरं तर यंदाच्या ऑस्कर पुरस्कारांच्या यादीत लिंकन, झिरो डार्क थर्टी हेही चित्रपट होते. लिंकन तर थेट बराक ओबामांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकिर्दीशी साम्य सांगणारा सिनेमा होता. पण वंशभेद ही काही अमेरिकेची आजची समस्या नाही. तर ओसामाला मारल्याच्या घटनेला ग्लोरिफाय करणारा सिनेमा होता, झिरो डार्क थर्टी. पण तपासकामात केलेले अत्याचार, व्हाईट हाऊसमधून थेट माहिती पुरवण्यासाठी दिग्दर्शक कॅथिरन बिगलो यांना केलेलं सहकार्य यामुळे या सिनेमाला पुरस्कार देणं नाकावर पाडणारं ठरलं असतं. त्यामुळे या सिनेमांपेक्षा 'ओर्गो' सरस ठरला. तो त्यातला नायक हा अमेरिकन हिरो ठरतो यामुळे. सिनेमात मॅंडीसला उद्देशून त्याचा बॉस म्हणतोही, यू आर ग्रेट अमेरिकन, अमेरिकेला कायम एक हिरो हवा असतो. ती गरज ओर्गोने पूर्ण केली. सीआयने हा सिनेमा तयार व्हावा. असं जर खरंच केलं असेल तर भविष्यात त्यावरही एखादा सिनेमा येऊ शकतो.

मॅंडीस यांच्या पुस्तकाप्रमाणे सिनेमाही वेधक ठरला. अर्थात सिनेमॅटीक लिबर्टी म्हणून काही गोष्टी आपल्याला खपवून घ्यायला लावल्यात. त्यामुळे वाद होणंही साहजिकच होतं. मेंडीस हे दक्षिण अमेरिकन होते. सिनेमात त्यांना अमेरिकन दाखवण्यात आलंय. तेव्हा बेलने मेंडीस साकारण्याविषयीचा सूर तीव्र नाराजीचा होता. खुद्द मेंडीस यांनी, आपण लॅटीनो आहोत तसंच सिनेमात दाखवायलाच हवं असं काही नाही. असं सांगून या वादावर पडदा टाकण्याची घाई केली.पण वाद शमलेला नाही. इराणमधून सुटकेसाठी त्यांना स्वित्झर्लंडला जाणाऱ्या विमानाची तिकीटं कॅनेडियन अधिकाऱ्याच्या पत्नीने आणून दिली होती. विमानतळावर त्यांची फार कसून तपासणी झाली नाही वगैरे वगैरे, पण या सगळ्याकडे दुर्लक्ष करत सिनेमा पाहणं खचितच योग्य ठरतं.

प्रत्यक्ष घटनेत खूप जास्त नाट्य होतं. त्यात अमेरिकी सरकार, सीआयए यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. सिनेमात ते नाट्य तितक्या ताकदीने उमटलेलं नाही, हे खरंच आहे. काही समीक्षकांनी तर बेनचा आधीचा चित्रपट द टाऊनशीचच त्याची तुलना केली. त्याच्या मते, सत्याचा संदर्भ असलेला हा थ्रीलरपट आहे. ओर्गोचं वास्तव निराळं आहे, यात शंकाच नाही. एक सिनेमा म्हणून त्याकडे पाहिलं. तर तो प्रेक्षकांना गुंगवून ठेवणारा आहे. हे म्हटलंय खुद्द ते टेलर यांनीच, प्रेक्षक म्हणून आपल्यालाही ओर्गोचं हे वास्तव नजरअंदाज करावं लागतं. नेमक्या त्याच गोष्टीमुळे पुरस्कारात बाजी मारलेल्या ओर्गोचं यशाला गालबोट लागलंय. आपल्याला हवा तसा इतिहास बदलण्याचं पातक करणाऱ्यांच्या पंक्तीत हा सिनेमा जाऊन बसलाय. हे वास्तव मात्र नाकारता येत नाही.

●●●

भारतीय सिनेमा

१००

सिंहावलोकन

# मातब्बर चित्रसंस्था बॉम्बे टॉकीज

● अरुण पुराणिक

**बोलपट युग १९३०च्या दशकात सुरू झाल्यानंतर तांत्रिक सफाईसाठी स्टुडिओज्ना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले. बोलपट युगावर प्रभाव टाकणारा मुंबईतला पहिला स्टुडिओ बॉम्बे टॉकीज मालाडला सुरू झाला. तसेच बॉम्बे टॉकीज ही लिमिटेड कंपनी होती. समाजातले महत्त्वाचे लोक या स्टुडिओच्या संचालक मंडळात संस्थापक हिमांशु रायनी एकत्र आणले होते. या स्टुडियोचा अल्पपरिचय. भारतीय सिनेमाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीत स्टुडिओ युगाचे १९५० पर्यंत महत्त्वाचे योगदान होते.**

**आजकाल** मनोरंजन आणि विरंगुळ्याची साधने, माध्यमे आणि जागा इतक्या उपलब्ध झाल्या आहेत की कधी कधी त्या सर्वांचा उबग येऊन शहराबाहेर कुठेतरी शांत ठिकाणी जाऊन रहावेसे वाटते. आजकाल मनोरंजनापेक्षा मन:शांतीची अधिक गरज भासते.

परंतु ८५ वर्षांपूर्वी फार वेगळी परिस्थिती होती. चित्रपट व्यवसायात क्रांती होऊन मूक चित्रपटांऐवजी बोलपटांचा जमाना सुरू झाला. करमणूक ही केवळ नाटक, सिनेमा, मेळे, तमाशे या पुरतीच मर्यादित होती. काही खाजगी जलसे, मैफिली होत, परंतु त्यात सर्व सामान्यांना स्थान नव्हते. २७ जुलै १९२७ मध्ये, व्हॉईसरॉय यांच्या हस्ते मुंबई रेडिओस्टेशनचे उद्घाटन झाले. त्यामुळे संगीतविषयक काही कार्यक्रम रेडिओवर ऐकायला मिळत.

ग्रामोफोनवर संगीताच्या ध्वनीमुद्रिका ऐकणे ही सुद्धा उच्चभ्रू समाजाची मिरासदारी होती. काँग्रेस हाऊस भागात गाणे बजावणे चाले, परंतु तिथे जाणारा वर्ग वेगळा होता. या सर्व परिस्थितीत सामान्य जनतेच्या खिशाला परवडेल असे बोलपटांचे माध्यम लोकांनी डोक्यावर उचलून घेतल्यास नवल नव्हते.

चित्रपट निर्मिती व वितरण क्षेत्रांत मुंबई पहिल्यापासूनच आघाडीवर होती. अर्देशीर इराणी यांचा पहिला बोलपट 'आलमआरा' दि.१४ मार्च १९३१ रोजी गिरगावातील मॅजेस्टिक चित्रपटगृहांत झळकला. त्याकाळी सुद्धा, इम्पीरियल, सागर, रणजीत, कृष्णा, भारत, सरोज अशा अनेक नावाजलेल्या चित्रपट निर्मिती संस्था मुंबईच्या विविध भागात कार्यरत होत्या. गिरगाव, गँटरोडच्या नाक्यावर विविध सिनेमाच्या रंगीबेरंगी, पोस्टर्सनी नववधूप्रमाणे सजलेली, नटलेली व प्रेमाने ऐकमेकांना बिलगून उभी असलेली सिनेमागृहे ही मुंबईकरांची खास आवडती ठिकाणे होती. काळ्या बाजारांत तिकिट खरेदी करून चित्रपट पहाणे भूषण मानले जात असे.

१९३४-३५ च्या दरम्यान, मालाडच्या, दादीसेठ रोडवर हिमांशूराय यांनी बॉम्बे टॉकीज या चित्रपट निर्मिती संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. बॉम्बे टॉकिज म्हणजे एक संस्थानच होते. त्यामध्ये, कला, संगीत, नृत्य, लेखन, छाया, नेपथ्य, प्रयोगशाळा, ग्रंथालय आदि स्वयंपूर्ण विभाग होते. शेकडो देशी विदेशी तंत्रज्ञ इथे काम करीत होते. आजच्या

अनेक नावाजलेल्या कलाकारांनी एकेकाळी आपल्या फिल्मी कारकिर्दीची सुरवात बॉम्बे टॉकिज मधूनच केली होती.

संगीतकार मदन मोहन यांचे वडिल, रायबहादूर चुनीलाल हे तेथे महाव्यवस्थापक होते. आजचे चरित्र अभिनेते अशोककुमार हे प्रयोग शाळेत सहाय्यक पदावर तर शशधर मुकर्जी हे ध्वनी संकलक होते. अमिया चक्रवर्ती हे कँन्टीन मॅनेजर तर विमल राय फोटोग्राफी खात्यात होते.

संगीतकार एस. एन. त्रिपाठी हे वादक कलाकार म्हणून सरस्वती देवीच्या वाद्यवृंदात काम करीत होते. बॉम्बे टॉकीजच्याच 'ज्वार भाटा' (१९४४) चित्रपटात अभिनय करून दिलिपकुमारनी चित्रपट व्यवसायात पदार्पण केले. त्या काळांत प्रभात (कोल्हापूर) रणजीत (मुंबई) या सारखीच बॉम्बे टॉकीज मातब्बर संस्था होती.

मे १९४० मध्ये हिमांशूराय यांचे निधन झाले. तेव्हा बॉम्बे टॉकीजची धुरा त्यांची पत्नी देविकाराणी यांनी सांभाळली. त्यांच्याच देखरेखी खाली निर्माण झालेल्या 'किस्मत' (१९४३) चित्रपटाने तर कलकत्त्याच्या रॉक्सी थिएटर मध्ये सतत तीन वर्षापेक्षा अधिक काळ चालण्याचा विक्रम केली.

हिमांशू राय यांच्या निधनानंतर बॉम्बे टॉकीजच्या सदस्यांमध्ये गंभीर मतभेद झाले. स्टुडिओ पडण्याच्या मार्गावर आला. तेव्हा राय बहादूर चुनीलाल व शशधर मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली कलाकार तंत्रज्ञ बॉम्बे टॉकीज सोडून बाहेर आले व फिल्मिस्तान मध्ये दाखल झाले. दि. २८ एप्रिल १९४३ रोजी फिल्मिस्तान लिमिटेड या चित्रपट निर्माण संस्थेची कायदेशीर रीत्या स्थापना झाली. तेंव्हा पासून गोरेगांव रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेला एस. व्ही. रोडवर (पुर्वीचा घोडबंदर रोड) पाच एकरांच्या विस्तीर्ण परिसरात हा ऐतिहासिक स्टुडिओ मोठ्या दिमाखात गेली ५४ वर्षे उभा आहे. (अपूर्ण) ●●●

## पत्रसंवाद

संपादक,

स.न.वि.वि.

भारतीय चित्रपटसृष्टीचा शतक महोत्सव साजरा करण्याचा उत्साह सामाजिक व सरकारी अशा दोन्ही पातळीवर भरभरून वाहताना दिसतो ही आनंदाची बाब तशीच आहे. परंतु अती उत्साहात कांही चुकीचे संदेशही दिले जातात ते टाळले जावेत हीच अपेक्षा.

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी 'प्रस्तुत चित्रटच' २०१३ हा महोत्सव प्रभादेवी, मुंबई येथे साजरा झाला. त्यांत चित्रपती श्री. व्ही. शांताराम ह्यांच्या जरठ-कुमारी विवाह प्रथेचा निषेध करणाऱ्या 'कुंकु'ह्या चित्रपटाचे वर्णन 'पुनर्विवाहा विरुद्ध बंड' असे केले आहे.

तसेच बंधुप्रेम व दिलेला शब्द पाळतांना दाह सोसावा लागणाऱ्या आधुनिक हरिश्चंद्राचे दर्शन घडवणाऱ्या अलीकडील 'काकस्पर्श' ह्या चित्रपटाला 'स्त्रीची अेकनिष्ठता' असे विशेषण लावले आहे.

मराठी सामाजिक जीवनांत कांही बांधिलकी मानूण वावरणाऱ्या दोन व्यक्तिंचा उल्लेख सदर उत्सवाचे संकल्पक म्हणून करण्यात आलेला आहे हे एक अधिकचे दुर्दैव.

**-गिरीश कर्वे**

सायन, मुंबई-२२

# संस्कृती संवादाचे अवशेष

● जी. के. ऐनापुरे



**कन्नड दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूट मधून दिग्दर्शनाचा डिप्लोमा घेऊन बाहेर पडले. आणि घटश्राद्ध (१९७८) या पहिल्याचं चित्रपटानें राष्ट्रीय स्तरावर पोचले.**

**१९७८ ते २०१२ या पंचवीस वर्षात गिरीशनी सातत्यानें १३ कन्नड चित्रपट दिग्दर्शित केले. त्यांच्या चित्रपट विश्वाचा वेध घेणारी ही लेखमाला**

## <u>लेखांक सातवा</u>

**'द्विपा'** मधील नागी अशीच आहे. ह्या सिनेमामधील दुगाप्पा, नागी, गणप्पया, कृष्णा ह्या चारही पात्रांचा जगण्याबद्दलचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. त्याचं मुख्य कारण त्यांच्या वयातील अंतर. कृष्ण आणि नागी ज्या पद्धतीने एकाच पातळीवर येतात, त्या पद्धतीने बाकीची पात्रे क्वचितच, कृष्णाने सृष्टीसीं दर्यात हरवून जाण्याचे (चैतन्य अशा अर्थाने) मूड छान पकडले आहेत. तर गणप्पया ह्याच्या उलट त्याच्यातला चैतन्याचा भाग अंशात्मक असाच राहिलेला. नागीच्यात हा भाग चढउतार अशा अर्थाने दिसतो आणि दुगाप्पाचा वयानुसार आलेला ठामपणा शेवटी हताशपणात आणि मान्य करण्यात बदलतो. हे चारही दृष्टिकोनाचे मूळ (Origin) एकाच निसर्गातून, पर्यावरणातून आपल्या हाताला लागतात. निसर्गाच्या विविधतेचे मूळ मानवी स्वभावात कसे अवतरते किंवा बदलते. (न्यूटनचा नियम ऊर्जा ह्या अर्थाने) असा एक व्यापक आणि वेगळा (universal) अर्थ 'द्विपा'मध्ये सापडतो. मुळात नागी ह्या व्यक्तिरेखेला ह्या सिनेमात जेवढे आयाम आहेत. (Shade) तेवढे कुठल्याच व्यक्तिरेखेला नाहीत. निसर्गातलं सामान्य जगणं, पाऊस आणि वाढणाऱ्या पाण्यामुळे निर्माण होणारी चिंता, बायको आणि सून म्हणून होणारी घालमेल, दुगाप्पाच्या मृत्यूचा आघात, गणप्पयाच्या अबोलपणामुळं निर्माण होणारी पोकळी, कृष्णाच्या आगमनानं आलेला खेळकरपणा, चैतन्य, आतून जागृत झालेली स्त्रीत्वाची जाणीव, स्वत:च स्वीकारलेला अबोला, वाघाच्या अस्तित्वाने निर्माण झालेली भीती, गणप्पयाच्या हताशपणामुळे, पर्याय नाही, अशा जाणिवेनं आलेला करारीपणा, गणप्पयाला हताशपणातून बाहेर काढण्यासाठी केलेले प्रयत्न,

कृष्णाच्या आगमनाने गणप्पयाच्या अंतरंगात अवतरलेला तुसडेपणा समजुतीच्या पातळीवर घालवण्याचा केलेला प्रयत्न, गणप्प्ययानं सगळं देवामुळं असं म्हटल्यामुळे आपल्या संघर्षाला कोणताही अर्थ नाही. अशी येणारी जाणीव. त्यातून आलेला हताशपणा, अशा अनेक गोष्टी नागीच्या व्यक्तिरेखेला सशक्त करणाऱ्या आहेत. परंपरा, भीती, अविरत संघर्षामुळे त्यातून बाहेर पडण्यासाठी दिसणारा मार्ग हे कोणत्याही अडाणी स्त्रीच्या जगण्याचे प्राधान्यक्रम असू शकतात. ते नागीच्यात सुद्धा आहेत. फक्त ह्या आतल्या आणि बाहेरच्या संघर्षाला निसर्ग कारणीभूत आहे. तसा निसर्गच सगळ्या गोष्टींना कारणीभूत असतो. बुद्धाच्या अनित्यवादाचे गणित असेच काही तरी आहे. 'नागी' ही व्यक्तिरेखा करणारी सौंदर्या ही कन्नडमधील आघाडीची हिरोईन. स्त्रीची 'ऊर्जा' अशा अर्थानं असणारं अस्तित्व आणि सौंदर्य यांचा मिलाप आपल्या भूमिकेत तिनं छान पकडला आहे. प्रत्येक टप्प्यातनं जाणारा तिचा सराईतपणा आपल्याला भिडतो. त्यात कृत्रिमपणाचा लवलेशही येत नाही. मुळात नागी म्हणून सौंदर्या शोभते सुद्धा. तिला दुगाप्पा (वासुदेवराव) गणप्पया (अविनाश), कृष्णा (हरीश राजू) ह्या तिघांनी तोलामोलाची साथ दिलेली आहे. नागी (सौंदर्या) च्या व्यक्तिरेखेला या तिघांच्या कामामुळेच ठसठसीतपणा आता आहे. हे मान्य करावे लागते. असे असेल तरी हा सिनेमा स्त्रीप्रधान होत नाही. हे महत्त्वाचे. या सिनेमाच्या शेवटच्या भागात अवतरणारा नागीचा करारीपणा नर्मदाताई (ताईसाहेब) आणि हसीना (हसिना) ह्यांच्या रांगेत बसविता येतो. पण नागीचे व्यक्तिमत्त्व त्यातूनही शिल्लक राहतच. ह्या व्यक्तिरेखेचा पोतच वेगळा आहे आणि असा पोत पकडणे आणि तो त्याच्या ताकदीने पकडून, त्या त्या पर्यावरणीय तपशिलासह सादर करणे, ही कासारवल्ली ह्यांची



ताकद आहे. 'द्विपा' मध्ये सहजच आपल्याला दिसून येते. ह्या सिनेमात येणारं वाघाचं प्रतीकही सिनेमातल्या इतर प्रतिकासारखं ताकदीचं आणि सिनेमाच्या आशयाला उठाव देणारं असं आहे. हा वाघाचा आवाजच सिनेमात अधनं मधनं येत असतो. शेवटी तर वाघ गाईलाच खातो. सुरूवातीला वाघाचे पंजेच दिसतात आणि त्याच्यावर दुगाप्पाचा पाय पडतो किंवा दुगाप्पा त्याच्यावर पाय ठेवतो आणि त्याच्यानंतर यक्षगानचं संगीत सुरू होतं आणि बिअरिंगमधील दुगाप्पा आपल्याला दिसतो. हे फारच सुंदर आलंय. नागी तर हेरंब हेगडेच्या घरात आल्यावर त्या घराचं एक दार वाघापासून संरक्षण ह्या अर्थानं कायमचंच बंद करून टाकते. तर जगण्यातला फोलपणा आल्यावर गणप्पया हे दारच मोडून टाकतो. हे दार मोडून काढल्यामुळे वाघाच्या आवाजानं, कृष्णा गेल्यामुळे आणि गणप्पयाच्या हताशपणे झोपून राहण्याला कंटाळलेली नागी वाघापासून रक्षण करण्यासाठी सगळ्या घराभोवती जाळ करून गणप्पयाला आणि स्वत:ला वाचविण्याचा प्रयत्न करते. वाघाचे प्रतीक (न दिसणाऱ्या) सिनेमात अस्तित्व अशा अर्थानेच येते. सिनेमातल्या चारही व्यक्तिरेखा आपलं आस्तित्व धोक्यात आल्याप्रमाणेच एकमेकांशी वर्तन करत असतात. पण वाघासारखं गुरगुरण्याची ताकद त्यांच्यात नसते. अबोला हेच त्याचं हत्यार. सुरुवातीला उगीचच आलेलं

आहे. असं वाटणारं वाघाचं प्रतीक सिनेमाच्या पुढच्या भागात अपरिहार्य बनते आणि एका दृश्याचा उल्लेख ह्याला जोडून करायलाच हवा. हे दृश्य कृष्णाचं आनंद घेणं कोणत्या थराला गेलं आहे. ह्याचा प्रत्यय देणारं आहे. हेरंब हेगडेच्या घरात आल्यावर आडोशाला उभा राहून घराला छत नसलेल्या भागातून पडणारा पाऊस बघून तो मोठमोठ्यानं ओरडत असतो. गणप्पयाला त्याचा राग येतो. नागीला त्याचा मूड ध्यानात येऊन ती पण त्याच्यात सहभागी होते. ह्या दृश्याच्या पुढच्या भागात पावसाचा जोर वाढल्यावर हेगडेचं घर पण ठिपकायला लागतं. इकडे नागी आणि गणप्पयाच्यातला ताण वाढलेला. त्याचा सुगावा कृष्णाला लागलेला. पण ठिबकणाऱ्या थेंबांना बघून तो त्याच्याखाली एक भांडं लावतो. त्याचा आवाज येतो. मग दुसऱ्या थेंबाखाली दुसऱ्या आकाराचं भांडं लावतो. मग तिसऱ्या थेंबाखाली त्यांच्यापेक्षा लहान भांडं लावतो. त्यांच्यातून येणारे वेगवेगळे आवाज ऐकून कृष्णा त्यात पूर्णपणे सामील होतो. मग भांड्यांची आदलाबदल करून त्यांच्यातून विचित्र संगीत गणप्पयाला आणि नागीला ऐकवतो. आणि स्वत:ही एक्साईट होऊन त्यात सामील होतो. प्रचंड राग आलेला (हे संगीत ऐकून) गणप्पया उठतो आणि ही सगळी भांडी लाथेने उडवतो. अशाप्रकारचं दृश्य सुचणं ही फारच अवघड गोष्ट आहे. त्यासाठी आशयातला दिग्दर्शकाचा खोल शिरकाव (पाण्याखाली राहिल्यासारखा) गरजेचा असतो. हा शिरकाव भूतकाळाच्या आधारावर, अनुभवावर, लहानपणी बघितलेल्या गोष्टीवर अवलंबून असतो. कासारवल्लींचा हा शिरकाव आपल्याला टोकदारपणे जाणवतो. बऱ्याचदा क्लायमॅक्स हा सिनेमाचा प्राण असतो. कासारवल्लींच्या सिनेमाची जातकुळी पाहतां त्याला क्लायमॅक्सची गरज नाही. असेच वाटते. तरीही मुलाखत कर्त्याने विचारल्यामुळे कासारवल्ली ह्यांनी 'द्विपा'चे क्लायमॅक्स सांगितले आहेत. पहिला क्लायमॅक्स, जेव्हा पाणी धरणाच्या वरून वाहायला लागते आणि नागी गणप्पयाला धावतच सांगायला येते की, आपण सुरक्षित जागेत आहोत, आपल्याला पाण्याबद्दल वाटणारी भीती संपलेली आहे. असा आहे. तर दुसरा क्लायमॅक्स ही बातमी सांगितल्यानंतरचा आहे. ही बातमी सांगितल्यानंतर सिनेमा आणखी दोन मिनिटे सुरू राहतो. त्यात असे दिसते की, गणप्पयाला आपल्या बायकोच्या सहकार्याचा वाटा मान्य नाही. नागीला वाईट वाटतं आणि एकटं सुद्धा. त्यावेळी तिला 'द्विपा'सारखे वाटते. पुढे कासारवल्ली म्हणतात. ह्या सिनेमातली प्रत्येक व्यक्तिरेखा पाण्याने वेढलेल्या बेटासारखी आहे. त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. कोणत्याही प्रकारची मानवी सहानुभूती नाही. हा दुसरा क्लायमॅक्स ध्यानात घेतल्यावर सिनेमाच्या अर्थनिर्णयाचा वेगळा कोपरा आपल्या हाताला लागतो आणि सिनेमाचे मागचे सगळे संदर्भ बदलतात आणि आपल्याला हा अर्थ डोक्यात घेऊन सिनेमा नव्याने बघावा लागतो. अर्थात वेगवेगळ्या चौकटी 'द्विपा'ची ताकद आहे. ●●●

संपादक : **सुधीर नांदगांवकर,** मुखपृष्ठ/मांडणी/व्यंगचित्र:**रघुवीर कुल**
मुद्रक,प्रकाशक:**संदीप मांजरेकर** छपाई :**रचनामुद्रण**,दादर,मुंबई-१४. Email : cinesudhir@gmail.com

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

प्रति,

प्रेषक : **वास्तव रूपवाणी** प्रभात चित्र मंडळ, शारदा सिनेमा, दादर, मुंबई-४०००१४.

**सेल्युलॉइड मॅन' ३ मे रोजी प्रदर्शित होणार**

भारतीय सिनेमाचे १००वे वर्ष ३ मे ला सुरू होत आहे तो मुहूर्त साधून शिवेन्द्रसिंग डुंगरपूर दिग्दर्शित 'सेल्युलाइड मॅन' पीव्हीआर थिएटर मधे प्रकाशीत होणार आहे. सेल्युलाइड मॅन ही डाक्युमेंटरी नॅशनल फिल्म आर्काइव्हचे माजी संचालक पी.के.नायर यांच्या कर्तृत्वाचा आलेख चितारणारी आहे. पुण्याची नॅशनल फिल्म अर्काइव्ह हे सरकारी चित्रपट संग्रहालय श्री. नायर यांच्या प्रयत्नांतून उभे राहिलेले आहे.

**प्रभात : मार्च महिन्याचे कार्यक्रम**

१३ मार्च (बुध) — **आवारा**
(हिंदी/१९५१/१६३मि.)
दिग्द. राजकपूर

२० मार्च (बुध) — **देवदास**
(हिंदी/१९५१/१५९मि.)
दिग्द. बिमल रॉय

२२ मार्च (शुक्र) — **गाइड**
(हिंदी/१९६५/१८३मि./रंगीत)
दिग्द. विजय आनंद

**रंगस्वर, चव्हाण सेंटर सायं. ६.३० वा.**

१९ मार्च (बुध) — **झनक झनक पायल बाजे**
(हिंदी/१९५५/१४३मि./टेवनीकलर)
दिग्द. व्हि. शांताराम

१९ मार्च (बुध) — **कागज के फूल**
(हिंदी/१९५९/१४८मि.)
दिग्द. गुरूदत्त

**दादर माटुंगा कल्चरल सेंटर**
**सायं. ६.३० वा.**

**फ्रिबोर्ग २०१३ महोत्सवात पांच भारतीय चित्र**

स्वित्सर्लंड मधे १६-२३ मार्च २०१३ भरणाऱ्या फ्रिबोर्ग आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ५ भारतीय चित्रपट दाखवले जाणार आहेत ते पुढील प्रमाणे - स्टॅन्ले का डब्बा , मुंबईचा राजा, वनमोअर अर्जुन आणि कल्पना.

**फा य न ल क ट**

**रघुवीर कुल**

**'मार्च' towards अवॉर्डस्**

